# अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ

जा.क्र./अं.न.प/विधी/२०२४-२५/६०  दिनांक - ०१/०१/२०२५

## जाहिरात

अंबरनाथ नगरपरिषदेच्या वतीने न्यायालयीन प्रकरणांचे कामकाज हाताळण्याकरीता वकिलांचे पॅनेल तयार करण्यात येत आहे. त्यानुसार मा. सर्वोच्च न्यायालय, मा. उच्च न्यायालय, मा. दिवाणी न्यायालय ( वरिष्ठ व कनिष्ठ स्तर) उल्हासनगर व कल्याण व मा. कामगार व औद्योगिक न्यायालय तसेच इतर न्यायालयांतील अंबरनाथ नगरपरिषदे विरूध्द असलेली न्यायालयीन प्रकरणे, दावे-खटले यांचे कामकाज चालविण्याकरीता इच्छुक वकिलांकडून खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून अर्ज मागविण्यात येत आहेत.

**अटी व शर्ती -**

१. संबंधित अर्जदाराकडे विधी प्रमाणपत्र, बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्रची नोंदणीकृत सनद आवश्यक आहे.

२. अर्जदारास किमान ७ वर्षांचा शासकीय, निमशासकीय तसेच सरकार अनुदानित संस्थांची न्यायालयीन प्रकरणे हाताळण्याचा अनुभव असणे आवश्यक आहे.

३. सदर नियुक्तीचा कालावधी हा तीन वर्षांचा असेल तसेच, नियुक्त करण्यात आलेल्या विधी तज्ञांचे कामकाज असमाधानकारक असल्यास किंवा त्यांच्या सेवेबद्दल काही प्रश्न उपस्थित राहिल्यास मा. मुख्याधिकारी, अंबरनाथ नगरपरिषद यांचा निर्णय अंतिम राहील.

४. महाराष्ट्र शासनाच्या विधी विभागाने प्रसिद्ध केल्यानुसार पॅनेलवरील वकिलांचे दरपत्रक निश्चित करण्यात येईल.

५. सदर जाहिरातीस अनुसरून प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करुन वकिलांची नियुक्ती करण्यात येईल याबाबत मा. मुख्याधिकारी व मा. प्रशासक अंबरनाथ नगरपरिषद यांचा निर्णय अंतिम राहील.

६. नगरपरिषदेकडे जसा निधी उपलब्ध होईल त्याअनुषंगाने वकीलांची फी अदा करण्यात येईल.

७. सदरची पॅनेल अधिवक्ता निवडण्याची कार्यवाही कोणतेही कारण न देता स्थगित करण्याची अथवा रद्द करण्याचे अधिकार मा. मुख्याधिकारी व मा. प्रशासक अंबरनाथ नगरपरिषद यांनी राखून ठेवले आहेत.

८. प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केलेली अर्हता व अनुभव इत्यादी किमान असून, किमान अर्हता धारण केली म्हणून अर्जदार निवडीस पात्र असणार नाही. विहित मुदतीत परिपूर्ण कागदपत्रांसह तसेच नमूद केलेला अनुभव धारण करीत असलेले अभियोक्ता (वकील) यांचे अर्ज विचारात घेतले जातील.

९. सर्व अर्ज नगरपरिषदेच्या नागरी सुविधा केंद्रातील आवक-जावक विभागात स्वीकारले जातील. अर्ज स्विकारण्याची मुदत दि. ०६/०१/२०२५ ते दि. १७/०१/२०२५ पर्यंत असेल.

सही/-

(अभिषेक पराडकर)

मुख्याधिकारी

अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ.

Mahabharti.in